# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./२६७९/२०१८ दि. १०/०८/२०१८

**अत्यंत तातडीचे**

## परिपत्रक

**विषय :- राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र व राज्य सहकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी दिनांक ०७, ०८ व ०९ ऑगस्ट २०१८ या कालावधीत पुकारलेल्या ३ दिवसांच्या संपाबाबत-**

संदर्भ :- मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर यांचे कार्यालयीन पत्र क्र. उशिनाग /आस्था/९४४३/२०१८, दिनांक निरंक

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, सरकारी - निमसरकारी कर्मचारी शिक्षक संघटना समन्वय समिती व विविध अधिकारी कर्मचारी संघटनांनी दिनांक ०७, ०८ व ०९ ऑगस्ट २०१८ या कालावधीत पुकारलेल्या ३ दिवसांच्या संपाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी दिनांक ०७ , ०८ व ०९ ऑगस्ट २०१८ रोजीची उपस्थिती सोबत जोडलेल्या विवरण पत्रात गट अ,ब,क व ड संवर्गांनुसार तसेच सदर संपात सहभागी कर्मचाऱ्यांच्या नावासह यादी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर व विद्यापीठास सादर करण्यात यावी. सदर माहिती ही अचुक व विनाविलंब सादर करण्यात यावी.

**(डॉ. गो. दा. दुबे)**
**कुलसचिव(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
# सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर - ४४० ००१
Web : www.dirhe.in/jdnagpur
E-Mail : jdhengp@rediffmail.com | E-Mail : rjdng.dhepune@nic.in
फोन नं. ०७१२-२५६१७१३ | फॅक्स न. ०७१२-२५५४२३०

क्रमांक : उशिनाग/आस्था/ ८७७२ /२०१८ दिनांक :

तात्काळ/महत्वाचे/ई-मेलव्दारे

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय
आवक क्र........ दि............
जावक क्र.1067 दि. 02/08/18.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक 3991 8/8/18
6640 10/8/18

प्रति,

१. कुलसचिव,
रा.तु.म.नागपूर विद्यापिठ,नागपूर/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली/
कविकुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक/नॅशनल लॉ विद्यापीठ, नागपूर.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 3485 दि. 10.8.18
जावक क्र.................दि.............

२. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,
कायम विना अनुदानित महाविद्यालये, नागपूर विभाग.

विषय : राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी दि.७,८ व ९ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत पुकारलेल्या ३ दिवसांच्या संपाबाबत....

संदर्भ : १. शासन प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रंमाक : संघटना-१५१८/प्र.क्र./३४३/१६-अ, दि.०६ ऑगस्ट, २०१८.
२. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/मवि-१ दि.०७.०८.२०१८.

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सरकारी-निमसरकारी कर्मचारी शिक्षक संघटना समन्वय समिती व विविध अधिकारी कर्मचारी संघटनांनी दिनांक ०७,०८ व ०९ ऑगस्ट २०१८ या कालावधीत पुकारलेल्या ३ दिवसांच्या संपाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांची दिनांक ०७, ०८ व ०९ ऑगस्ट २०१८ रोजीची उपस्थिती सोबत जोडलेल्या विवरण पत्रात गट अ,ब,क व ड संवर्गानुसार तसेच सदर संपात सहभागी कर्मचाऱ्यांच्या नावासह यादी तात्काळ या कार्यालयास सादर करण्यात यावी. सदर माहिती ही अचुक व विनाविलंब सादर करण्यात यावी.

सहपत्र - वरिलप्रमाणे

मा. कुलसचिव महोदय यांचेकडे अग्रेषित,
8/8/2018

(डॉ. अर्चना नेरकर)
सहसचालक उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.करीता

प्रत : मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

आस्थापना
श्री. बोबडे
त्वरित परिपत्रक टाकावे
10/8/18

प्रप्रत्र - अ

महाविद्यालयातील संपकालावधीतील उपस्थितीबाबतची माहिती

दिनांक- ०७.०८.२०१८

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | संवर्ग | एकूण अधिकारी/कर्मचारी यांची संख्या | पूर्व परवानगीने रजेवर असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | संपात सहभागी झालेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | गट-अ | | | | |
| | | गट-ब | | | | |
| | | गट-क | | | | |
| | | गट-ड | | | | |
| | | एकूण | | | | |

टिप - सोबत संपात सहभागी कर्मचायांची यादी जोडण्यात यावी.

राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी दि.७, ८ व ९ ऑगस्ट,२०१८ या कालावधीत पुकारलेल्या ३ दिवसांच्या संपाबाबत .....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संघटना-१५१८/प्र.क्र.३४३/१६-अ
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ६ ऑगस्ट, २०१८

## प रि प त्र क

राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांनी कर्मचा-यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दि. ७, ८ व ९ ऑगस्ट,२०१८ या ३ दिवसांच्या कालावधीमध्ये संप करण्याची नोटीस शासनास दिली आहे. सदर संप मागे घेण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. ४.८.२०१८ रोजी सर्व संघटनांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेवून त्यामध्ये संघटनांच्या विविध मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. तसेच बैठकीच्या शेवटी मा. मुख्यमंत्री महोदयांनी संघटनांना समाधानकारक पर्याय दिलेला असल्याने संघटनांनी सर्व बाबींचा विचार करुन संपावर जाण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा असे आव्हान केले. तथापि संघटनांकडून याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसल्याने संपामध्ये राज्यातील अधिकारी/ कर्मचारी सामील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र या संघटनांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक २९ खाली शासन मान्यता प्राप्त संघटना नाहीत.

३. दि. ७,८ व ९ ऑगस्ट, २०१८ या ३ दिवसांच्या संप कालावधीत शासनाचे कामकाज सुरळीतरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग/तसेच त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांना पुढे दर्शविल्याप्रमाणे उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत:-

अ) शासकीय-निमशासकीय कर्मचारी यांनी संपामध्ये सहभागी होणे, ही बाब गैरवर्तणूक समजण्यात येईल व अशा कर्मचा-यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे आदेश विनाविलंब निर्गमित करण्यात यावेत व ते सर्व कर्मचारी यांच्या व्यक्तीशः निदर्शनास आणावेत. तसेच त्या आदेशाची प्रत शासनाच्या प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या सूचना फलकावर लावण्यात यावी.

ब) कर्मचाऱ्यांनी संपात सहभागी न होता, नेहमीप्रमाणे कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावा.

क) संप काळात कार्यालय नियमित वेळेवर उघडण्याची व बंद करण्याची योग्य ती व्यवस्था करावी व ती व्यवस्था जबाबदार अधिकारी यांचेकडे दयावी. आवश्यकता भासल्यास गृहरक्षक/पोलिस दलाची मदत घ्यावी.

ड) विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी संप काळात आपले मुख्यालय सोडून जावू नये.

इ) विभागप्रमुखांनी /कार्यालय प्रमुखांनी या आदेशाच्या दिनांकापासून संप संपेपर्यत कोणत्याही शासकीय कर्मचा-यास कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये आणि जे कर्मचारी रजेवर असतील अशा प्रत्येक प्रकरणी विचार करुन त्यांची रजा रद्द करुन त्यांना कामावर तात्काळ बोलवावे किंवा कसे ते ठरवावे.

ई) शासकीय कर्मचा-यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे **"काम नाही वेतन नाही"** हे धोरण राज्य शासनही अनुसरत असल्याचे कर्मचा-यांना अवगत करावे.

फ) ज्या शासनाच्या सेवा महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा अधिनियमांतर्गत घोषित करण्यात आलेल्या आहेत अशा सेवेबाबत कर्मचारी यांना अवगत करावे. जे कर्मचारी संपावर जातील त्यांचेविरूद्ध सदर कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यात यावी.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये संप काळात अत्यावश्यक व इतर सेवा सुरळीत चालू राहतील याबाबत उपाययोजना कराव्यात.

५. सदर ३ दिवसांच्या संप कालावधीमध्ये प्रत्येक दिवशी कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचारी यांची माहिती क्षेत्रिय कार्यालयांनी त्यांचेशी संबंधित मंत्रालयीन विभागांना कळवावी व मंत्रालयीन विभागाने त्यांच्या विभागाची माहिती दुपारी १२.०० वाजेपर्यत व अधिपत्याखालील कार्यालयांची संकलित माहिती दुपारी २.०० वाजेपर्यत या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात कार्यासन १६-अ, सामान्य प्रशासन विभाग, नवीन प्रशासन भवन, ६ वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे सादर करावी. तसेच ईमेल पत्ता dilip.deshmukh@nic.in या ई-मेलवरही अचूक पाठवावी. यापूर्वी असे निदर्शनास आले आहे की, कर्मचारी यांच्या उपस्थितीची कार्यालयनिहाय माहिती विहित वेळेवर उपलब्ध करुन देत नाहीत. तेव्हा यावेळी काळजीपूर्वक सदर माहिती विहित कालमर्यादेत देण्याची व्यवस्था करावी.

६. सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात संपाच्या कालावधीत उपस्थितीची माहिती दुपारी १२.०० वाजेपर्यत या विभागाकडे अचूक पाठवावी. तसेच संपाच्या कालावधीतील उपस्थितीची टक्केवारी दुपारी १२.०० वाजेपर्यत या विभागाकडे अचूक प्राप्त होईल अशाप्रकारे पाठवावी.

७. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०८०६१९५३३०७२०७ हा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c0832d8de5eaf131faf7d6c0a149c3a4cf3436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2018.08.06 19:59:19 +05'30'

(टि. वा. करपते)
उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

सोबत :-प्रपत्र

प्रति,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधान सभा, महाराष्ट्र, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२.
२. सर्व सन्माननीय विधान परिषद /विधान सभा व राज्यातील संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
९. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
११.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१२.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१३.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई ३२
१४.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ३२
१५.प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान परिषद), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१६.प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान सभा), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१७.सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२

१८. महासंचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई ३२ (५ प्रती)
त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक प्रसिध्दीसाठी पाठवावे.
१९.सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
२०.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य
२१.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२.राज्यातील सर्व महामंडळे,मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२३.उपसचिव, (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२
२४.विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
२५.सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती)
२६. निवड नस्ती (कार्यासन १६-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

# प्रपत्र - अ

## मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांची संप कालावधीतील उपस्थितीबाबतची माहिती

दुपारी १२.०० वाजता/ दुपारी २.०० वाजता

मंत्रालयीन विभाग-.................. दि. ७,८ व ९ ऑगस्ट,२०१८

गट -

| संवर्ग | एकूण अधिकारी /कर्मचाऱ्यांची (संख्या) | | पूर्व परवानगीने रजेवर असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | | संपात सहभागी झालेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | | कार्यालयात उपस्थित असलेल्या अधिकारी/कर्मचारी (संख्या) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय | विभागा-अंतर्गत | क्षेत्रिय कार्यालय |
| गटनिहाय (अ/ब/क/ड) | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | |

## प्रपत्र-ब

क्षेत्रिय अधिका-यांनी त्यांच्याशी संबंधित मंत्रालयीन विभागांना परस्पर पाठविण्याबाबतची माहिती

क्षेत्रिय कार्यालयाचे नाव ................ जिल्हा-..................

त्यांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग- ............. दि. ७,८ व ९ ऑगस्ट,२०१८

गट -

| संवर्ग | एकूण अधिकारी/कर्मचारी (संख्या) | पूर्व परवानगीने रजेवर असलेले कर्मचारी (संख्या) | संपात सहभागी झालेले कर्मचारी (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले कर्मचारी (संख्या) |
|---|---|---|---|---|
| गटनिहाय (अ/ब/क/ड) | | | | |
| एकूण | | | | |

## प्रपत्र - क

विभागीय आयुक्त कार्यालय तसेच त्यांच्या अधिपत्याखालील महसूली कर्मचाऱ्यांसह अन्य सर्व शासकीय कार्यालयातील जिल्ह्यांतील कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतची माहिती.

विभागीय आयुक्त- दि. ७,८ व ९ ऑगस्ट,२०१८

गट -

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | एकूण अधिकारी/ कर्मचा-यांची (संख्या) | पूर्व परवानगीने रजेवर असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | संपात सहभागी झालेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) |
|---|---|---|---|---|---|
| | जिल्हा | | | | |
| १. | खुद्द | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| ६. | | | | | |
| ७. | | | | | |
| ८. | | | | | |
| एकूण | | | | | |

टिप : दि. ७,८ व ९ ऑगस्ट,२०१८ या ३ दिवसांच्या कालावधीमधील प्रत्येक दिवसाचे स्वतंत्र विवरणपत्र देण्यात यावे.

-----xxxxxx-------